**वादी तर्फे अतिरिक्त सरतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**१०.** आता मला वादीने माझ्या हक्कात करुन दिलेले मूळ वटमुखत्यारपत्र दाखवले, त्याला **नि. क्र.५५** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलट तपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**११**. माझे आठवी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. माझे व वादीचे १९८० साली लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, किणे ते हेब्बाळ–जलद्याळ हे अंतर २० ते २५ कि.मी. आहे. हेब्बाळ–जलद्याळ हे गाव नेसरीच्या पुर्वेला असून नेसरी पासून १० कि.मी. अंतरावरती आहे. किणे गावाच्या पुर्वेला नेसरी गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, किणे ते नेसरी अंतर १५ कि.मी. आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो, ते अंतर १० कि.मी. आहे.

**१२**. येसूबाई केसरकर यांना सोनाबाई व वादी अशा दोन वारस आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला लग्नानंतर वादीच्या घराण्याबाबत माहिती झाली आहे. वादीचे शिक्षण झालेले नाही. लग्नापासून वादी माझ्यासोबत हेब्बाळ–जलद्याळ येथे राहत आहे. आमच्या लग्नावेळी माझे सासरे हयात नव्हते. वादीचे लग्न होण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ च्या आईचे लग्न झालेले होते. प्रतिवादी क्र.१ च्या आईचे तारेवाडी, ता. गडहिंग्लज हे सासर होते. जानबा देसाई हा तारेवाडीचा होता.

**१३**. माझ्या सासू–सास–यांच्या हयातील प्रतिवादी क्र.१ च्या आईचे लग्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर एक वर्षाने माझ्या सासू–सास–यांनी प्रतिवादी क्र.१ च्या आई–वडिलांना त्यांच्याकडे ठेवून घेतले होते. प्रतिवादी क्र.१ च्या आईचे किणे गावात निधन झालेले आहे. प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र. ३ आणि ४ यांची आई ही सोनाबाईची मुले आहेत. मला त्यांचा जन्म किणे येथे झाल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जानबा देसाईचा मृत्यू किणे येथे झाला आहे.

**१४**. मी प्रतिवादी क्र.१ ने दिलेली कैफियत वाचली आहे. मला प्रतिवादी क्र.१ चे वडिल मुंबई येथे नोकरीला असल्याचे आठवत नाही. प्रतिवादी क्र.१ चे वडिल मुंबई येथून नोकरी सोडून १९९३–१९९४ साली किणे येथे आले होते. मला तो मोरारजी मिलमध्ये नोकरीला असल्याची तसेच नोकरी सोडल्यानंतर पैसे मिळाल्याची माहिती नाही.

**१५**. वादीची प्रकृती ठिक असून ती दैनंदिन कामे करते. हे म्हणणे खरे नाही की, वादीला व्यवहारज्ञान आहे. वादीचे वटमुखत्यारपत्र घेण्यास कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी स्वतः न्यायालयात हजर राहून जबाब देऊ शकते. वादी अशिक्षित असल्यामुळे न्यायालयात येऊन जबाब देऊ शकत नाही. अशिक्षित व्यक्ती न्यायालयात जबाब देऊ शकते याची मला माहिती आहे.

**१६**. मला प्रतिवादी क्र.१ च्या आईच्या लग्नानंतर वादीचे किती वर्षांनी लग्न झाले याबाबत आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी सत्य परिस्थिती सांगेल त्यामुळे मी तिचे खोटे वटमुखत्यारपत्र घेतले आहे. मी माझ्या दाव्यात व शपथपत्रात उल्लेख केलेला फेरफार क्र.१५५० येसूबाई संतू केसरकर च्या नावे झालेला आहे. त्याचप्रमाणे दावा घर मिळकतीला येसूबाई संतू केसरकरच्या नावाची नोंद झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा घर मिळकतीमध्ये येसूबाई सोबत प्रतिवादी क्र.१ ची आई तिच्या पती व मुलांसह राहत होती.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, माझे व वादीचे लग्न प्रतिवादी क्र.१ च्या आई–वडिलांनी आणि येसूबाईने करुन दिलेले आहे. साक्षीदार सांगतो, त्यांचे लग्न येसूबाईने करुन दिलेले आहे. माझे व वादीचे लग्न किणे येथे झालेले असून त्याचा संपुर्ण खर्च येसूबाईच्या परिवाराने केला होता. मला मसणू सुतार, मोतीराम केसरकर, परसू सलामवाडे व भागोजी पताडे हे किणे गावचे पंच असल्याची माहिती नाही. मसणू सुतार व्यतिरिक्त इतर लोक आजरोजी मयत आहेत. मला ते कधी मयत झाले याबाबत माहिती नाही. मला त्यांच्या निधनाबाबत ऐकीव माहिती आहे.

**१८**. संतू केसरकर १९७४ साली अपघातामध्ये मयत झाला होता, त्यावेळी वादी अज्ञान होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ चे आई–वडिल येसूबाई सोबत राहत होते. काळोजी सट्टू पाटील हे येसूबाईचे सख्खे भाऊ असून ते माझे वडिल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, येसूबाईने तिच्याकडील आठ तोळे सोने लग्नामध्ये वादीला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने लग्नामध्ये सोने स्विकारुन त्याबाबत पंचांसमक्ष दावा मिळकतींमधील हिस्सा सोडून दिला होता. मला वादी व माझे लग्न ठरविताना येसूबाईच्या बाजूने कोण पंच होते ते आठवत नाही.

**१९**. मी प्रतिवादींनी या दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली आहेत. मला येसूबाईला '*यशोदा*' या दुस-या नावाने ओळखत असल्याची माहिती नाही. आता मला दाखवलेल्या दि.११.१०.२०११ रोजीच्या खरेदीपत्रातील आणि त्यासोबत लावलेल्या मतदान ओळखपत्रातील छायाचित्र येसूबाईचे असल्याचे ओळखता येत नाही. मला प्रतिवादी क्र.१ व त्याच्या आई-वडिलांचे किणे गावचे रेशनकार्ड व मतदान कार्ड असल्याची माहिती नाही. मला गावात राहणा-या व्यक्तीचे रेशनकार्ड व मतदार यादीत नाव दाखल होत असल्याची माहिती नाही.

**२०**. वादी, माझी व माझ्या मुलांची हेब्बाळ-जलद्याळ गावाच्या मतदार यादीला नावे असून आमचे रेशनकार्ड आहे. आम्ही कायमस्वरुपी हेब्बाळ-जलद्याळ गावी राहत असल्यामुळे आमच्या सदर नोंदी झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ च्या नावे दि.११. १०.२०११ रोजी खरेदीपत्र झालेले आहे. आता मला ते खरेदीपत्र दाखवले, ते तेच असून साक्षीदाराला उलट तपासात दाखविल्यामुळे त्याला ओळखीसाठी **नि. क्र.५६** देण्यात येतो. सदर विक्रीपत्रावरुन फेरनोंद झालेली आहे.

**२१**. आम्ही सदर फेरनोंदीला महसूल विभागाकडे आव्हानित केलेले नाही. आम्ही सदर खरेदीपत्राबाबत या दाव्या व्यतिरिक्त इतर कोठेही तक्रार केलेली नाही. येसूबाई दि.१३. ०१.२०१५ रोजी मयत झालेली असून तिने सदर खरेदीपत्राबाबत तिच्या हयातीत तक्रार केल्याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, येसूबाई कडून खरेदी केलेल्या जमिनीमध्ये प्रतिवादी क्र.१ ची वहिवाट होती व आहे. आम्ही दावा दाखल करेपर्यंत दावा घरमिळकत येसूबाई ऊर्फ यशोदा संतू केसरकर च्या नावे दाखल होती.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, दावा प्रलंबित असताना दावा घर मिळकत पडली होती. त्या जागेवरती प्रतिवादी क्र.१ ने नवीन घराच्या बांधकामाला सुरुवात केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याला राहण्यासाठी घर नसल्यामुळे त्याने नवीन घराचे बांधकाम करायला सुरुवात केली होती. मला प्रतिवादी क्र.१ त्याच्या आई-वडिलांनंतरही किणे गावात राहत असल्याची माहिती नाही.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीं बाबत काहीही माहिती नाही. आम्ही

दावा दाखल करताना दावा मिळकतींना प्रतिवादी क्र.१ चे नाव होते. आम्ही प्रतिवादी क्र.१ चे नाव कधी व कसे लागले आहे याची माहिती घेतली होती. आम्ही त्याचे नाव कशाच्या आधारे लागली याची माहिती घेतली नव्हती. आम्ही त्याचे नाव लागलेले असल्यामुळे दावा दाखल केलेला आहे. आम्ही प्रतिवादी क्र.१ चे नाव लागल्या बाबत प्रांत कार्यालय, भुदरगड येथे अर्ज केला होता, त्याचा निकाल प्रतिवादी क्र.१ च्या बाजूने लागला होता. आम्ही त्या निकालाच्या विरोधात आजपर्यंत कोठेही दाद मागितलेली नाही.

**२४**. दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात असल्यामुळे आम्ही दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केली आहे. दावा मिळकती येसूबाईने खरेदी दिल्यापासून प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. येसूबाईच्या नावावरील मिळकती तिच्या हयातीत प्रतिवादी क्र.१ चे आई-वडिल कसत असल्यामुळे त्यांच्या ताब्यात आहेत. येसूबाईच्या मृत्यूनंतर तिच्या नावावरील मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. आम्हाला आणखीन साक्षीदार तपासायचे नाहीत.

**२५**. आमच्याकडे प्रतिवादी क्र.१ ला दावा मिळकतींपासून ५,००,०००/- रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळत असल्याचे दाखविणारा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सांगत असल्या प्रमाणे प्रतिवादी क्र.१ ला दावा मिळकतीं पासून उत्पन्न मिळत नाही. हे म्हणणे खरे नाही की, येसूबाईने प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात खरेदीपत्र करुन दिलेले असल्यामुळे ते वादीवरती बंधनकारक आहे. दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात असल्यामुळे त्याला त्यांची विक्री करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात असून माझे व त्याचे कधीही बोलणे-चालणे झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या वतीने प्रतिवादी क्र.१ ला त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - २५.११.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.